(81) I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): औरंगाबाद ग्रामीण **P.S.**(ठाणे): फुलंब्री **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0274 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/10/2020 02:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 01/10/2020
**Date To** ( दिनांक पर्यंत): 02/10/2020
**Time From** (वेळेपासून): 16:20 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 02:24 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 02/10/2020 **Time** (वेळ): 02:24 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 004 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 02/10/2020 02:24 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 7 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पाल फाटा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): आजीनाथ आन्ना तुपे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा महालकिन्होळा, ता फुलंब्री,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा महालकिन्होळा, ता फुलंब्री,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्षल निवृत्ती येवले | | | 1. रा केअर ऑफ सोमिनाथ पवार उगम, हॉटेल मागे फुलंब्री,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पंडित कडुबा जेठे | | | 1. रा शिरोडी खु ता फुलंब्री,फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद फुलंब्री, जि. औरंगाबाद. दि. 01/10/2020मी आजीनाथ आन्ना तुपे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती/हटेल, रा. महालकिन्होळा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद. मोबाईल नं. 9423908585, 9823447718.समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून घरात आई-वडील, भाऊ कैलास आन्ना तुपे, पत्नी, भावजय व मुलांसह एकत्र कुटूंबी राहतो. आमच्या कुटुंबियांची एकत्रीत शेतजमीन माझे वडील श्री आन्ना धोंडीबा तुपे व मोठा भाऊ कैलास आन्ना तुपे यांच्या नावे आहे. तसेच मी फरशी फाटा ता. फुलंब्री येथे गुरुकृपा हटेल नावाचे उपाहारगृह चालवतो. सदर शेती व हटेलच्या उत्पनातुन आमच्या कुटूंबाची उपजिवीका चालते.मौजे महालकिन्होळा ता. फुलंब्री शिवारात गट नं. 187/2 मध्ये माझा मोठा भाऊ नामे कैलास आन्ना तुपे यांच्या नावे असलेल्या चार एकर जमिनीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवणी (POCRA) योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानित शेततळे घेतले आहे. सदर शेततळे तालुका कृषी अधिकारी यांनी मंजुर केल्यानंतर घेण्यात आले असून त्याचे खोदकाम, रोलींग, फिनिशींग, कंपाउंड व पन्नी इत्यादी काम माहे फेब्रुवारी/मार्च 2020 मध्ये पुर्ण करण्यात आले. तसेच शेततळ्याच्या खर्चापोटी आलेल्या 1,67,950/- रुपयांचे बील तालुका कृषी अधिकारी कार्यालय फुलंब्री येथे सुमारे तीन महिन्यांपुर्वी सादर करण्यात आले आहे. सदरचे कामकाज तालुका कृषी अधिकारी कार्यालय फुलंब्री येथील कृषी सेवक श्री येवले यांच्याकडे आहे.माझ्या भावाच्या नावावर असलेल्या सदर शेततळ्याच्या अनुदानाची रक्कम मिळण्यासाठी मी वेळोवेळी तालुका कृषी अधिकारी कार्यालय फुलंब्री येथे जावून श्री येवले यांची भेट घेतली. सुमारे दोन महिण्यापुर्वी श्री येवले साहेब यांनी माझ्या भावाच्या नावे असलेल्या शेततळ्याच्या अनुदानाच्या रकमेचे बील अपलोड करण्यासाठी माझ्याकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी केली. परंतू मी त्यांना माझ्याकडे पैसे नसल्याचे सांगीतले होते. तेव्हा श्री येवले साहेब मला म्हणाले होते की, तुमचे अनुदानाचे पैसे तुमच्या भावाच्या नावावर बँकेत जमा झाल्यानंतर मला 30,000/- रुपये आणून दया. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो होतो. त्यानंतर दिनांक 30/09/2020 रोजी रात्री 8.30 वा. च्या सुमारास मी माझ्या हटेलवर फरशी फाटा येथे असतांना श्री येवले साहेब यांनी मला त्यांच्या फोन क्र. 9960802429 वरुन फोन करुन सांगीतले की, तुमच्या भावाचे शेत तळ्याचे अनुदानाचे पैसे तुमच्या भावाच्या नावावर बँकेत जमा केले आहेत. मी तुम्हाला यापुर्वी सांगीतल्याप्रमाणे मला 30,000/- रुपये आणून दया. तेव्हा मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो. त्यानंतर आज दि. 01/10/2020 रोजी सकाळी 09.00 वा. श्री येवले साहेब यांनी मला पुन्हा फोन करुन सांगीतले की, मी 11.00 वा. फरशी फाटा येथे येणार आहे, तेव्हा तुम्ही मला मी सांगीतल्याप्रमाणे 30,000/- रुपये दया असे म्हणाले. माझी श्री येवले साहेब, कृषी सेवक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लगेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

औरंगाबाद येथे फोन करुन माहिती दिली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री ढाकणे त्यांच्या स्टाफ व पंचांसह फरशी फाटा येथे दुपारी 12.30 च्या सुमारास आले. तेव्हा मी पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांना भेटल्यानंतर त्यांनी पंचांसमक्ष माझा परीचय करुन घेवून त्यांचा तसेच त्यांच्या सोबतचे पोलीस स्टाफ व पंच 1) श्री रविंद्र प्रभाकर जगदाळे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), वित्त विभाग, जि.प. औरंगाबाद, रा. एन-11 हडको औरंगाबाद, व पंच 2) श्री प्रदिप बाबुराव कंजे, सहाय्यक अधिक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, औरंगाबाद, रा. एन-8, सिडको औरंगाबाद अशांचा परिचय करुन दिला. त्यानंतर मी माझी तक्रार दोन पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री ढाकणे साहेब यांना सांगीतली. ती त्यांनी लपटपवर तयार करुन त्याची प्रिंट काढली. सदर तक्रारीवर मी तसेच पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे व दोन पंचांनी सहया केल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे यांनी माझ्या व दोन्ही पंचाच्या संमतीने प्रस्तुत प्रकरणात पंचा समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन सदर कारवाई दरम्यान व्हईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच एक सोनी कंपनीचा व्हईस रेकर्डर त्यांचेकडील बगमधून काढुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच सदर व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये संभाषण रेकर्डींग होत असल्याचे सांगुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकले. तसेच सदर मेमरी कार्ड मध्ये अगोदरचे कोणतेही संभाषण नसल्याची माझी व दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईस अनुसरुन आवश्यक त्या सुचना मला, पंच श्री. रविंद्र जगदाळे, श्री प्रदिप कंजे व सापळा पथकातील कर्मचारी याना दिल्या.त्यानंतर सापळा पथकातील कर्मचारी श्री. राठोड यांनी त्यांचेकडील व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. त्यांनतर मी व पंच श्री. रविंद्र जगदाळे असे माझ्या कडील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणाहून दुपारी 13.30 वा. च्या सुमारास निघून फरशी फाटा येथील माझ्या गुरुकृपा हटेल येथे आलो. थोडयाच वेळात तेथे श्री येवले साहेब, कृषी सेवक आले. तेथे माझे श्री येवले साहेब, कृषी सेवक यांच्याशी माझ्या कामासंबंधी बोलणे झाले. तेव्हा श्री येवले साहेब यांनी मला पैसे आणले का असे विचारले. तेव्हा मी त्यांना नाही असे म्हणून किती दयायचे असे विचारले तेव्हा त्यांनी मला अगोदर सांगीतल्याप्रमाणे 30,000/- रुपये मागीतले. तेव्हा मी त्यांच्याकडे काहीतरी कमी करण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी तीस हजार पैकी दोन हजार रुपये कमी दे असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यानंतर मी त्यांना पैसे घेवून येतो असे म्हणून पंच श्री. रविंद्र जगदाळे यांच्यासह माझ्या मोटार सायकलवर बसून सापळा पथक थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी दुपारी 14.10 वा. च्या सुमारास परत आलो. तेथे श्री. राठोड यांनी माझे अंगावर लपवून ठेवलेले व्हईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला. त्यानंतर सदर व्हाईस रेकर्डरमध्ये रेकर्ड झालेले संभाषण मी तसेच पोलीस निरीक्षक श्री ढाकणे व दोन्ही पंचांनी ऐकले. त्यामध्ये श्री हर्षल येवले, कृषी सेवक यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी माझ्या व पंचांच्या संमतीने सदर प्रकरणी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे यांच्या सुचनेवरुन मी माझ्या अंगावरील सर्व साहित्य टेबलावर काढुन ठेवले. त्यामधील लाचेच्या रक्कमे करीता आवश्यक असणाऱ्या पाचशे रुपये दराच्या 56 चलनी नोटा असे एकुण 28,000/- रुपये त्यांनी काढुन घेवुन उर्वरीत साहित्य व रोख रक्कम मला परत केली. त्यानंतर ऍ◌थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले व सापळा कारवाईसाठी आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच श्री हर्षल येवले यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझ्या तोंडाला बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून हातात घेवून लाचेची रक्कम स्विकारल्या बाबत इशारा करण्याची सुचना दिली. सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या ऍ◌थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन व्हईस रेकर्डर माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. दरम्यान श्री हर्षल येवले यांनी मला फोन करुन लाचेची रक्कम घेवून पाल फाटा येथे येण्यास सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी दिलेल्या सुचनांनुसार मी व्हाईस रेकर्डरसह पंच श्री रविंद्र जगदाळे यांच्यासोबत माझ्याकडील मोटारसायकलवर तसेच पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे, सापळा पथकातील कर्मचारी व पंच श्री प्रदिप कंजे असे शासकीय वाहनात बसुन 15.50 वा. रवाना झालो व पाल फाटा येथे आलो. तेथे माझी तसेच श्री येवले, कृषी सेवक यांची रोडवर भेट झाली. तेव्हा मी श्री येवले साहेब यांना तुम्ही सांगीतल्याप्रमाणे 28,000/- रुपये आणले असे सांगीतले. तेव्हा त्यांनी सदरची रक्कम त्यांच्या सोबत असलेल्या पंडीत जेठे नावाच्या इसमाकडे देण्यास सांगीतले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी सदरची लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातून काढून श्री जेठे यांच्या समोर धरली असता श्री पंडीत जेठे यांनी लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्वीकारुन स्वत:च्या पॅन्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली. तेव्हा मी दुपारी 16.20 वा. च्या सुमारास माझ्या तोंडास बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून हातात घेवून सापळा पथकास इशारा केला. त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने पंच श्री प्रदिप कंजे यांच्यासह घटनास्थळी दाखल होत श्री हर्षल येवले, कृषी सेवक तसेच श्री पंडीत जेठे, खाजगी इसम यांना पकडुन त्यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत केली. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी त्यांचा परिचय करुन देत श्री हर्षल येवले यांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री हर्षल निवृत्ती येवले, वय 23 वर्षे, व्यवसाय नोकरी, कृषी सेवक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद, रा. व्दारा श्री सोमिनाथ पवार, उगम हटेल मागे, कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, फुलंब्री, जि. औरंगाबाद असे सांगीतले. तसेच श्री पंडीत जेठे यांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव पंडीत कडूबा जेठे, वय 34 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. शिरोडी खुर्द, ता. फुलंब्री जि. औरंगाबाद असे सांगीतले. ~~( एफआयआर मधील उर्वरित मजकुर खालील प्रमाणे~~)त्यानंतर श्री पंडीत जेठे यांच्या हातांची तसेच कपडयांची अल्ट्राव्हयेलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री पंडीत जेठे यांच्या डाव्या हाताच्या पाचही बोटांचे पे-यावर व तळहातावर ठिकठिकाणी तसेच नेसत्या पॅन्टच्या समोरील डाव्या खिशाच्या तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी ऍ◌थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच श्री पंडीत जेठे यांच्या ताब्यातील लाचेच्या नोटा पंचांच्या समक्ष पडताळून पाहण्यात आल्या असता त्या सापळा कारवाईसाठी वापरण्यात आलेल्या नोटाच असल्याची खात्री झाली. तसेच सदर नोटांवर पंचांसमक्ष अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता त्यावर ऍ◌थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे. त्यानंतर माझ्या हातांची तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या बोटांचे पे-यावर तसेच अंगातील पन्टच्या समे◌ारील उजव्या बाजुच्या खिशाचे तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी ऍ◌थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी श्री येवले यांच्याकडे माझ्या भावाच्या अनुदानाच्या फाईल बाबत चौकशी करुन सदरची फाईल त्यांच्या राहते घरातून फुलंब्री येथून ताब्यात घेतली.त्यानंतर आम्ही सर्वजन श्री हर्षल येवले व श्री पंडीत जेठे यांच्यासह सदर प्रकरणी उर्वरित कारवाई करण्याकरीता ऍ◌न्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथे परत आलो. श्री हर्षल येवले व श्री पंडीत जेठे यांचेशी माझा कोणताही घेण्या-देण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच त्यांच्याशी वैर अगर दुश्मनी नाही. तरी आज दिनांक 01/10/2020 रोजी दुपारी 16.20 वा. च्या सुमारास औरंगाबाद ते सिल्लोड रोडवर पाल फाटा, ता. फुलंब्री येथे रोडवर श्री हर्षल निवृत्ती येवले, वय 23 वर्षे, व्यवयाय नोकरी, कृषी सेवक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझ्या भावाच्या नावे महाराष्ट्र शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवणी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानित शेततळयाच्या अनुदानाची रक्कम 1,67,950/- रुपये माझ्या भावाच्या बँक खात्यावर जमा केल्याचा मोबदला/बक्षीस म्हणून माझ्याकडे तडजोडी अंती 28,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच श्री पंडीत कडूबा जेठे, वय 34 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. शिरोडी खुर्द, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद यांनी श्री हर्षल येवले यांच्या सांगण्यावरुन सदर लाच रक्कम माझ्याकडून स्विकारली म्हणुन माझी त्याच्या विरुध्द फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** ASHOK Bansidhar SOKATAKAR

**Rank (पद):** HC (Head Constable)

**No.(क्र.):** POBN62234 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Samratsing Vijaysing Rajaput

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**